# तक्रार निवारण यंत्रणा
# कफ परेड मेट्रो स्थानक

दिनांक-30.08.2018

1. मा. उच्च न्यायालय, बॉम्बे यांनी याचिका क्र, 2107/2017 मध्ये दि. 24.08.2018 रोजी दिलेल्या आदेशानुसार, रात्रीच्या कालावधीमध्ये, म्हणजे रात्री 10 ते सकाळी 6 वाजेपर्यंत बांधकाम आणि/किंवा सहायक कार्य करण्यास असलेली स्थिगती, आदेशामध्ये असलेल्या काही अटींना अधिन राहून उठविलेली आहे.

2. उपरोक्त नमूद आदेशाचे पालन करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे कंत्राटदार, मे. एल अॅन्ड टी – एसटी ई सी (JV) द्वारे, कफ परेड मेट्रो स्थानक येथे 24 x 7 तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

3. कोणतीही व्यक्ती, अनुक्रमांक 6 अंतर्गत तक्त्यामध्ये नमूद केलेल्या परवानगीयोग्य ध्वनी पातळीच्या मर्यादेपेक्षा अधिक आवाजाने, कोणत्याही विशिष्ट क्षणी उद्विग्न झाल्यास तक्रार निवारण यत्रंणेमध्ये खालील नमूद केलेल्या टोल फ्री क्रमांक आणि/किंवा ई – मेल आणि/किंवा व्यक्तीश;, सी.पी.आर.ए. गार्डनजवळ, भुखंड क्रं. 105, कफ परेड येथे स्थापित केलेल्या सार्वजनिक माहिती केंद्रामध्ये (Public Information Booth) तक्रार नोंदविता येईल.

   1) टोल फ्री क्रमांक - 022 - 22186030

   2) ई – मेल- mumbaimetroline3ugc01@gmail.com

4. फक्त कफ परेड येथे सुरु असलेल्या किंवा सुरु राहणा-या मेट्रो बांधकामाच्या आवाजामुळेच उद्विग्न झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्याची ओळख जसे, नाव, भ्रमण ध्वनी क्र., ई–मेल आणि राहण्याचे ठिकाणाची माहिती, तक्रारीची नोंदणी करताना उघड करावयाची आहे, जी शक्स्तोवर सविस्त्र आणि

विशिष्ट असणे आवश्यक आहे, जेणेकरुन, सर्व सबंधितांना शक्य तितक्या लवकर सदर तक्रारीची दखल घेणे शक्य होईल. ही माहिती, गांभीर्य नसलेल्या तक्रारी प्रतिबंधित करण्यासाठी तसेच प्राप्त तक्रारींवर केलेली कार्यवाही आणि/किंवा निष्पती कळविण्यासाठी आवश्यक आहे.

5. तक्रार निवारण यंत्रंणेमध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीची तपासणी करुन सर्व साधारणपणे, तक्रार प्राप्त झाल्यापासून 3 तासामध्ये संबोधित करणेसाठी प्रयत्न करण्यात येईल.

6. मा. उच्च न्यायालयाच्या र्निदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रीकी संशोधन संस्थेने (NEERI) दि. 20-28 जुलै, 2018 दरम्यान नोंद केलेली वातावरणातील सरासरी ध्वनी पातळी खालील तक्त्यामध्ये नमुद केली आहे. (NEERI अहवालाच्या पृष्ठ क्र. 10 मधील तक्ता क्रमांक-3 चा अर्क)

| साईट कोड | स्थळ | वातावरणातील सरासरी ध्वनी पातळी dB(A) | |
|---|---|---|---|
| | | Leq Day | Leq Night |
| सी. एफ 1 | कार्यक्षेत्राच्या आत, गेट क्रं. 5 | 83.3 | 72.6 |
| सी. एफ 2 | दलामल पार्क | 82.3 | 73 |
| सी. एफ 3 | विनस बील्डींगच्या बाहेर | 77.6 | 66.7 |
| सी. एफ 4 | कार्यक्षेत्राच्या बाहेर, गेट क्रं. 3 | 82.3 | 75.2 |
| सी. एफ 5 | रेवील्स बील्डींगच्या जवळ | 83.1 | 78.4 |
| सी. एफ 6 | गुलीस्तान बील्डींग | 85.9 | 77.2 |
| सी. एफ 7 | सी. पी. आर. ए. गार्डन | 86.6 | 76.3 |

7. फिर्याद योग्य तक्रार ती असेल, जेव्हा तक्रार केलेल्या वेळेच्या, तात्काळ एक तास पूर्वी पर्यंत dB(A) Leq प्रमाणे नोंद केलेल्या वातावरणातील ध्वनीची पातळी, उपरोक्त नमूद केलेल्या वातावरणातील अस्तित्वात ध्वनीच्या सरासरी पातळी पेक्षा 10 dB(A) ने जास्त असेल.

आदेशानुसार
मुंबई मेट्रो रेल कॉपोरेशन लि.

कफ परेड येथील संबधित स्थानिक रहिवाश्यांना त्यांचे गृहर्निमाण संस्था कार्यालया मार्फत माहितीसाठी.